# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित**

क्रमांक : १०/एडीएम/पदविका/२०१३/४०५३

दिनांक : 18 JUN 2013

प्रति,
मा. सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील सर्व प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी इ. पदविका अभ्यासक्रमाच्या अल्पसंख्याक संस्थांच्या व विनाअनुदानित संस्थांच्या सस्थांरत्तरावरील जागांबाबत**

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी इ. अभ्यासक्रमाच्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया सुरु होत आहेत. संचालनालयाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या प्रवेश प्रक्रियेसाठी अल्पसंख्याक दर्जा प्राप्त असलेल्या संस्था तसेच खाजगी विनाअनुदानित संस्था अनुक्रमे अल्पसंख्याक कोटयातील तसेच संस्थास्तरावरील जागा केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे भरण्यासाठी शासनाकडे समर्पित करतात.

या संदर्भात कळविण्यात येते की, **शासन निर्णय अल्पसंख्याक विभाग क्रमांक अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि. २७.०५.२०१३ अन्वये** राज्यातील अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्थांसाठी कार्यपध्दती निर्धारित करण्यात आली आहे. (सोबत छायाप्रत जोडली आहे). त्यामधील प्रवेशा संदर्भातील तरतुद खाली नमुद करण्यात येत आहे.

**१०) iv) ब) नुसार** अनुदानित अल्पसंख्याक संस्थांनी त्यांच्या मंजुर प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५० टक्के जागांवर त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या समुहाच्या विद्यार्थ्यांना तसेच उर्वरित ५० टक्के जागांवर बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

**क) नुसार** विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५१ टक्के जागांवर त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या समुहाच्या विद्यार्थ्यांना तसेच उर्वरित जागांवर बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा असे नमुद केलेले आहे.

**ई) नुसार बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेशाची परवानगी देणेबाबतच्या तरतुदी स्पष्ट केलेल्या असुन** त्या पुढीलप्रमाणे आहेतः अल्पसंख्याक कोटयातील जागा भरण्यासाठी कमीत कमी चार मुख्य वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक राहील. सदर चा जाहिरातीपैकी २ जाहिराती राज्य स्तरावरील व २ जाहिराती राष्ट्रीय स्तरावरील तसेच एक मराठी, दोन इंग्रजी, संबंधित भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्रदान असणाऱ्या अल्पसंख्याक भाषेत ही जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक असणार आहे. **अल्पसंख्याक कोटयात बिगर अल्पसंख्याक उमेदवारांना प्रवेश देण्यासाठी संस्थांनी या जाहिरातींसह अर्ज करुन अल्पसंख्याक विभागाची विनिर्दिष्ट पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आले. सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अल्पसंख्याक विभागाकडुन तशी मान्यता देण्यात येईल.**

**अल्पसंख्यांक विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय अल्पसंख्यांक कोटयातील जागांचा केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत समावेश करु नये असे स्पष्ट निर्देशही सदर शासन निर्णयात देण्यात आलेले आहेत.**

वरील निर्देशांचा व तरतूदींचा विचार करता संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त काही संस्थांकडून केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेची पहिली फेरी सुरु होण्यासाठी अल्पसंख्यांक कोटयातील जागा केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेसाठी समर्पित केल्या जातात. दिनांक २७.०५.२०१३ च्या शासन निर्णयातील तरतूदी आणि निर्देशाचा विचार करता कोणत्याही अभ्यासक्रमासाठी अल्पसंख्यांक कोटयातील ५१ टक्के जागा केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेसाठी बिगर अल्पसंख्यांक कोटयातून भरण्यासाठी अल्पसंख्यांक विभागाची पूर्वपरवानगी अनिवार्य (compulsary) आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ज्या अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांनी अल्पसंख्यांक कोटयातील जागा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेसाइी समर्पित केल्या आहेत अशा संस्थांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, ही बाबत सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात यावी.

तसेच खाजगी विनाअनुदानित संस्था व अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांना २० टक्के संस्थास्तरावरील जागा असतात. त्या २० टक्के जागांपैकी किती टक्के जाग संबंधित संस्था भरणार आहे यांची माहिती संस्थेच्या संकेतांक (Institute Code) चा उपयोग करुन Log In केल्यानंतर प्रत्येक अभ्यासक्रम आणि विषयनिहाय जागांची टक्केवारी ऑनलाईन नमूद करुन त्यांची प्रत विभागीय कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार केंद्रिभुत प्रवेश पध्दतीमध्ये उपलब्ध होणाऱ्या जागा विद्यार्थ्यांना दर्शविण्यात येतील.

या विषयानुषंगाने ज्या संस्थांनी संचालनालयाकडे पत्र सादर करुन केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेसाठी भरावयाच्या जागांची माहिती दिलेली आहे त्या संस्थांनीही ती माहिती नव्याने ऑनलाईन भरणे आवश्यक आहे राहील, ही बाबही सर्व संबंधित संस्थांनी कळविण्यात यावी.

खाजगी विनाअनुदानित संस्थांना त्यांच्या संस्थास्तरावरील तसेच अल्पसंख्याक संस्थांच्या बाबतीत संस्थास्तरावरील जागांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर भरण्यासाठी **दिनांक २१/०६/२०१३ पर्यंत व भरलेली माहिती आपल्या कार्यालयास सादर करण्यासाठी दिनांक २४/०६/२०१३ पर्यंत** मुदत देण्यात येत आहे. या मुदतीत संस्थांनी जागा संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपडेट कराव्यात असे आपल्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात यावे. तसेच संकेतस्थळावर भरलेल्या माहितीत चुक होणार नाही यांची संबंधित संस्थेने दक्षता घ्यावी.

**(डॉ. सुभाष महाजन)**
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई.